:\Encroachment\Information Act 2005\Informataion-1-4-16 to 31-2-17.doc - 255

माहितीचा अधिकार

अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई/ २४१२
दिनांक : २८/८/१८

श्रीमती कनीज सुखरानी
ए/३, हर्मेस ड्रोम I, २११/३/१बी,
विमाननगर, पुणे-४११०१४.

यांस...

**विषय** : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत.

**संदर्भ** : इकडील कार्यालयाकडील आवक क्र. ई/४७०२, दि.१३/०८/२०१८ रोजीचा आपला माहिती अधिकारातील अर्ज.

संदर्भांकित माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये आपण विचारणा केलेल्या एकूण ९ मुददयांबाबतची या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती मुद्देनिहाय खालीलप्रमाणे देत आहोत.

**मुद्दा क्र १ :-** सदर मुददयांबाबत या कार्यालयाकडे संकलित स्वरुपात माहिती उपलब्ध नसून उपलब्ध माहितीचे दस्त या कार्यालयाकडील जे प्लॉट गोडाऊन, घोले रोड येथे कार्यालयीन वेळी व दिवशी आपणास अवलोकनार्थ दाखविणेत येतील.

**मुद्दा क्र २ व ३ :-** या कार्यालयाशी संबंधित नाही. कारण कारवाई करतेवेळी FDA Licence बघितले जात नाही.

**मुद्दा क्र ४ व ५ :-** या मुददयाबाबतची या कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे दस्त (एकूण पाने २४) होत आहेत.

**मुद्दा क्र ६ :-** दि.२१/०८/२०१८ अखेरपर्यंत अंदाजे ९५५ गॅस सिलेंडर जमा करणेसाठी या कार्यालयाकडून गॅस कंपनीसमवेत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या ९५५ गॅस सिलेंडर पैकी एकूण २५० गॅस सिलेंडर जमा केलेले आहेत. उर्वरित गॅस सिलेंडर जमा करण्याची कार्यवाही या कार्यालयामार्फत चालू आहे.

**मुद्दा क्र ७ :-** या मुद्द्यामध्ये कालावधी नमूद न केल्यामुळे माहिती देणे अडचणीचे आहे. तरी देखील जे प्लॉट गोडाऊन, घोले रोड येथे कार्यालयीन वेळी व दिवशी आपण उपस्थित राहून हव्या असलेल्या माहितीबाबत चर्चा केल्यास आपणास उपलब्ध दस्त अवलोकनार्थ दाखविणेत येतील.

**मुद्दा क्र ८ :-** याबाबत या कार्यालयाकडे संकलित स्वरुपात माहिती उपलब्ध नाही.

**मुद्दा क्र ९ :-** सदर PIL No. 224 of 2011 बाबत शासन निर्णय क्र.बीएमसी-२५१५/प्र.क्र.१५१९/२०१६/नवि-२१ द्वारे कळविले आहे. या मुददयाबाबतची या कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे दस्त (एकूण पाने ५) होत आहेत.

मुद्दा क्र. ४ व ९ मधील एकूण पाने २९ व मुद्दा क्र. १ व ७ मधील आपणास हव्या असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रति पान रूपये २/- प्रमाणे शुल्क आकारून पुणे महानगरपालिकेच्या कोषागृहात चलनाद्वारे जमा केल्यानंतर सदरच्या झेरॉक्स प्रति आपणास अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, म.न.पा. भवन, पहिला मजला, खोली क्र. ११९, शिवाजीनगर, पुणे-५ येथे उपलब्ध करून देण्यात येईल.

कळावे.

(डी. आर. लंघे) २७/८
जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक,
(अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.
कार्यालय संपर्क क्र.:- ०२०-२५५०१३९२

**प्रत :-**
मा. गोडाऊन अधिक्षक
जे प्लॉट गोडाऊन, घोले रोड,
शिवाजीनगर, पुणे-५.

यांजकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी....

Scanned by CamScanner

F:\Encroachment\Information Act 2005\Appellate Authority.doc - 87 -

माहितीचा
अधिकार

अपिल प्राधिकारी तथा
उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत
बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.ई/2803 दिनांक :१५/९/१८

श्रीमती कनीज सुखरानी
ए/३, हर्मेस ड्रोम I, २११/३/१बी,
विमाननगर, पुणे-४११०१४.

यांस...

विषय : माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आलेल्या आपले प्रथम अपिल अर्जांचे सुनावणीबाबत.

संदर्भ : इकडील कार्यालयाकडील आवक क्र. ई/५७४७,दि.११/०९/२०१८ रोजीचा आपला माहिती अधिकारातील प्रथम अपिल अर्ज.

आपणास कळविण्यात येते की, आपले संदर्भांकित प्रथम अपिल अर्जावर मा. अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २५ / ९ /२०१८ रोजी सकाळी/~~दुपारी~~ ११.०० वाजता सुनावणी घेण्यात येणार आहे. सदर आपले अपिल अर्जावरील सुनावणीकरीता आपण आवश्यक त्या कागदपत्रासह अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, पहिला मजला, खोली क्र.१२०, मुख्य कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५ येथे दिलेल्या दिवशी व वेळी हजर रहावे.

सदर दिवशी आपण आपले प्रथम अपिल अर्जावरील सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यास आपणास आपले अपिलावर काहीही म्हणणे नाही, असे समजून आपले सदरचा प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे.

Information Received
24 pgs
Sukhrani
27/9/2018.

(माधव जगताप)
अपिल प्राधिकारी तथा
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.
15/9

**प्रत :-**

१) मा. जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक,
अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका.

२) मा. गोडाऊन अधिक्षक
जे प्लॉट गोडाऊन, घोले रोड,
शिवाजीनगर, पुणे-५.

यांस... उपरोक्त सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्र व माहितीसह हजर रहावे.

पत्र मिळाले

Scanned by CamScanner

# प्रथम अपील सुनावणी – दि. २५।०८।२०१८

आज अपील प्रकरणी मा. अपील अधिकारी यांचे समोर ~~अपील अर्ज~~ सुनावणी घेण्यात आली. उपरोक्त मुद्द्यांची उपलब्ध माहिती देणे बाबत सुनावणीत संबंधितांना आदेश दिले.

| | | |
|---|---|---|
| Wsulurani | [signature] | [signature] |
| अपील अर्जदार | जन माहिती अधि. | मा. अपील अधिकारी तथा |
| (मीनाक्षी कनोईहा सुरवराणी) | (अभियान) | उप. आयुक्त (अभियान) |